आर.सी.एस.क्र.97/2018 मधील निशाणी क्र.5 वरील आदेश
(इंद्रजीत लक्ष्मण कातळे वि. जनार्धन मनोहर कातळे)

सदर प्रकरणामध्ये वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश 39 नियम 1 व 2 प्रमाणे तात्पूरता मनाई हुकूमसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

2. वादीचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणेः—

वादी व प्रतिवादी हे चुलत भाउ असून ते मौजे. कुंभारी, ता. रेणापूर, जि. लातूर येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहेत. वादी व प्रतिवादी दोघेही शेतकरी आहेत. प्रतिवादी हा साखर कारखान्यामध्ये नौकरीला आहे. मौजे. कुंभारी येथील गट नं.29 मधील 1 हे 49 आर क्षेत्र ही वादीची वडीलोपार्जीत मिळकत आहे. सुरुवातीला गट नं.29 मधील मिळकत ही वादींच्या वडीलांची वडीलोपार्जीत मिळकत होती. त्यानंतर वादी व त्याचा भाउ पंडीत यांच्यामध्ये वाटण्या होवुन वाद मिळकत ही वादीच्या हिस्स्याला आली. तेव्हापासून वाद मिळकतीवर वादीचा ताबा असून वादी सदर मिळकत वहिवाटत आहे. प्रतिवादी हा गट नं.30 मधील 1 हे 43 आर जमिनीचा मालक असून त्याची जमिन वादमिळकती लगत वाद मिळकतीच्या पुर्वेला आहे. प्रतिवादीचा वादमिळकतीशी कोणताही सबंध नसताना तो बेकायदेशीरपणे वाद मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहे आणि वाद मिळकत व त्याच्या मिळकतीमधील हद्दीखुणा नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. सन जुन 2018 मध्ये वादी वाद मिळकतीमध्ये पेरणी करत असताना प्रतिवादीने वादीला हरकत अडथळा केला. दि.30/06/2018 रोजी प्रतिवादी पुन्हा वादीच्या मिळकतीमध्ये येवुन वादीच्या शांततामय वहिवाटीस हरकत अडथळा केला. वादीने त्याला हरकत अडथळा न करण्याची विनंती करुन सुध्दा त्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादीच्या विरुध्द फौजदारी खटला दाखल केला. त्यानंतर वादीने प्रस्तुतचा दावा दाखल करुन प्रतिवादी विरुध्द कायमस्वरुपी मनाई हुकूमाची मागणी केली आहे. वादीच्या मते सदरचा दावा गुणदोषावरती न्यायनिर्णीत होण्यासाठी बराचसा काळावधी जाणार आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादीने त्याच्या ताबेवहिवाटीस हरकत अडथळा केल्यास त्याचे कसानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने प्रतिवादीविरुध्द दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होईपर्यंत तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

3. प्रतिवादीने नि.क्र.20 वरती दाव्यास कैफीयत दाखल केली आहे. नि. क्र.22 वरती पुरसीस देवुन प्रतिवादीने त्याची कैफीयत हीच प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे समजण्यात यावे असे नमुद केले आहे. प्रतिवादीने कैफीयतीमध्ये असे नमुद केले आहे की, पुर्वी वादीचे वडील लक्ष्मण व प्रतिवादीचे वडील मनोहर हे मौजे. कुंभारी येथील सर्व्हे नं.18 मधील 12 एकर 9 गुंठे जमिनीचे सहमालक व कब्जेदार होते. सर्व्हे नं.18 मध्ये एकूण 24 एकर 19 गुंठा जमिन होती. सन 1971 मध्ये तुकडेबंदी कायदयानुसार जमिनीचे एकत्रिकरण झाले व सर्व्हे नं.18 मध्ये गट नं.28, 29 व 30 नव्याने तयार झाले. गट नं.29 व30 मधील जमिन वादी व प्रतिवादीच्या कुंटूबाच्या नावे नोंदणीकृत झाली. त्यानंतर वादी व प्रतिवादी यांच्या वडीलाच्यामध्ये तोंडी वाटणी होवुन त्यांना प्रत्येकी 6 एकर 4 गुंठे आणि 6 एकर 5 गुंठे असे क्षेत्र आले होते. परंतू, सदर वाटणी तोंडी असल्यामुळे त्याप्रमाणे सर्व्हे नं.18 ला नोंदी झाल्या नव्हत्या. त्यानंतर तुकडेबंदी कायदयानुसार गट नं.30 मध्ये कमी क्षेत्र असलेली मिळकत प्रतिवादीच्या वडीलांच्या नावे नोंदणीकृत झाली तर जास्त क्षेत्र असलेली मिळकत गट नं.29 मध्ये वादीच्या वडीलांच्या नावे लागली. खरे तर वादी व प्रतिवादी यांना त्यांच्या एकुण मिळकतीपैकी निम्मी निम्मी मिळकत वाटयाला आली होती. परंतू, एकत्रीकरणाच्या चुकीमुळे गट नं.30 मधील कमी क्षेत्र प्रतिवादीच्या नावे दिसुन येते तर गट नं.29 मधील जास्तीचे क्षेत्र वादीच्या नावे दिसुन येते. परंतू, सध्य स्थीतीमध्ये प्रतिवादी हे निम्म्या म्हणजेच 5 एकर 21 गुंठा क्षेत्रावरती कब्जेदार आहेत. त्याप्रमाणे गेल्या 25 ते 30 वर्षापुर्वी वादी व प्रतिवादीने त्यांच्या मिळकतीदरम्यान 1 नाला खोदला असून त्यामधून विदयुत पोल रोवलेले आहेत. वादी व प्रतिवादी दोघेही तेव्हापासून आपआपल्या मिळकतीवर कब्जेदार असून वहिवाट करत आहेत. परंतू, वादीला ही गोष्ट माहित आहे की, तुकडे बंदीमधील चुकीनुसार गट नं.29 मध्ये जास्त क्षेत्र असले तरी तो फकत 5 एकर 21 गुंठे क्षेत्रावरतीच कब्जेदार आहे. प्रतिवादींनी बराच वेळा तुकडेबंदी मधील चुक सुधारण्यासाठी वादी व त्याच्या कुटूंबीयांना समती देण्याची विनंती केली. त्यांनी त्या वेळी समती दर्शवली सुध्दा होती. पंरतू, आता सदर चुकिच्या नोंदीचा गैरफायदा घेवुन वादी प्रतिवादीला वाद मिळकतीतील त्याच्या कब्जातील मिळकतीतुन बेदखल करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा परिस्थितीत जर प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास

सदर आदेशाच्या आधारे वादी प्रतिवादीला त्याच्या कब्ज्यातील मिळकतीवरुन बेदखल करणार आहे. त्यामुळे त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

4. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरिल कागदपत्राचे अवलोकन केले. त्यानुसार खालील मुद्दे माझे विचाराधीन आले. सदर मुद्दे व त्यावरिल निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नमुद करत आहे.

अ.क्र.	मुद्दे		निष्कर्ष
1	वादीची प्रथमदर्शनी केस आहे का?	:	अंशतः होय.
2.	वादीचे बाजुने समतोल आहे का?	:	अंशतः होय.
3.	अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान संभवते का?	:	अंशतः होय.
4.	आदेश काय	:	अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

मुद्दे क्र. 1 ते 3 करिता :–

5. सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांचे विवेचन मी एकत्रीतपणे करत आहे. वादीने त्याची केस प्रथमदर्शनी सिध्द करण्यासाठी दावा मिळकत गट क्र.29 चा 7/12 उतारा तुकडेबंदीच्या वेळी वादी प्रतिवादी यांनी दिलेल्या उपअधिक्षक भुमिअभिलेख, रेणापूर यांच्या कार्यालयातील जबाबाची व नकाशाची साक्षांकित प्रत, प्रतिवादीच्या गट क्र.30 चा 7/12 उतारा इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. वादीच्या मते वाद मिळकत असलेला गट क्र.29 मध्ये त्याच्या नावे 1 हेक्टर 49 आर शेतजमिन आहे. अभिलेखावरिल गट क्र.29 वरिल 7/12 उतारा सुध्दा वादीच्या नावे 1 हेक्टर 49 आर जमिन दाखवतो. वादीच्या मते पुर्वी गट क्र.29 मधील एकुण 2 हेक्टर 99 आर क्षेत्र त्याच्या वडीलांच्या नावे होते. त्यानंतर सदर क्षेत्राच्या वाटण्या होवुन वाद मिळकत ही वादीच्या नावे आलेली आहे. परंतू, प्रतिवादीच्या मते वादी व प्रतिवादीच्या वडीलांच्या मध्ये गट क्र.29 आणि 30 मध्ये वाटण्या होवुन त्यामधील अर्धा अर्धा हिस्सा वादी व प्रतिवादींच्या वडीलांच्या नावे आलेला होता. म्हणजेच गट क्र.29 मधील दावा

मिळकतीच्या वाटण्या झाल्या होत्या ही बाब प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

6. परंतू, प्रतिवादीच्या मते ज्यावेळी वाटण्या झाल्या त्यावेळी गट क्र.29 आणि 30 मधील क्षेत्र हे सर्व्हे नं.18 मध्ये होते. त्यानंतर जमिन तुकडेबंदी कायदयानुसार सदर सर्व्हे नं.18 चे विभाजन होवुन गट नं.29 आणि 30 अस्तित्वात आले आणि सदर गटापैकी गट क्र.29 च्या अभिलेख सदरी वादीचे व गट नं.30 च्या अभिलेख सदरी प्रतिवादीचे नाव लागले. परंतू, गट क्र.29 मध्ये यापुर्वी झालेल्या वाटण्यानुसार वादीच्या नावे क्षेत्र न लागता प्रतिवादीच्या वाटणीस आलेले काही क्षेत्र वादीच्या नावे लागले. प्रतिवादीच्या मते सदर वादीच्या नावे अधिकचे असलेल्या क्षेत्रावरती आजही प्रतिवादीची कब्जेवहिवाट आहे. परंतू, प्रतिवादीने त्याच्या या कथनास दुजोरा देण्यासाठी कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. याउलट वादीने दाखल केलेल्या उपअधिक्षक भुमिअभिलेख यांच्या कार्यालयातील जबाबानुसार तुकडेबंदी योजने नंतर वादीच्या कुटूंबीयांच्या नावे एकुण 2 हेक्टर 99 आर जमिन नोंद झाल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे प्रतिवादीच्या वडीलांच्या नावे 1 हेक्टर 43 आर क्षेत्र लागले असल्याचे दिसुन येते. त्याप्रमाणे गट क्र.29 मध्ये वादीच्या कुटूंबीयांच्या नावे एकुण क्षेत्र 2 हेक्टर 99 आर असून गट नं. 30 मध्ये प्रतिवादीच्या नावे 1 हेक्टर 43 आर क्षेत्राची नोंद आहे. त्याचप्रमाणे सदर उपअधिक्षक भुमिअभिलेख रेणापूर यांच्या कार्यालयातील जबाब आणि नकाशा नुसार वादी व त्याचा भाउ यांच्यातर्फे अ.पा.क म्हणुन त्यांची आई शेषाबाई व प्रतिवादींचे वडील यांनी समती दिली असल्याचे निदर्शनास येते. सबब अभिलेखावरिल एकुण कागदपत्रांच्या अधारे प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने असल्याचे दिसुन येते.

7. परंतू, प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, तुकडेबंदी योजनेतील चुकांच्या मुळे प्रतिवादीच्या ताब्यात असलेले गट क्र.29 मधील क्षेत्र वादीच्या नावे लागलेले आहे. त्यामुळे जर प्रस्तुतचा अर्ज मंजूर केला तर सदर आदेशाच्या आधारे वादी प्रतिवादीला त्याच्या दावा मिळकतीतील ताबेवहिवाटीमधून बेदखल करु शकतो.

8. परंतू, प्रतिवादीच्या कथनास दुजोरा देण्यासाठी कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल नाहीत. वादीच्या विधीज्ञांच्या युक्तिवादानुसार जर प्रतिवादीला

तुकडेबंदी योजनेनुसार झालेले दावा मिळकतीचे फेरबदल मान्य नव्हते तर सदरची योजनेची सन 1971 मध्ये अंमलबजावणी झाल्यापासून आजअखेर प्रतिवादीने कोठेही अक्षेप का घेतलेला नाही. प्रतिवादीच्या कैफयतीमध्ये प्रतिवादीने तुकडेबंदीच्या सबंधीत अधिका—यासमोर सदर चुकिच्या नोंदीबद्दल दाद मागणार असल्याचे नमुद केले आहे. परंतू, आजअखेर अभिलेखावर प्रतिवादीने अशाप्रकारची दाद मागितले बाबतचे कोणतेही कागदपत्रे दाखल नाहीत.

9. वादीने त्याच्या कथनास दुजोरा देण्यासाठी रे.दि.मु.नं.381/2007 च्या वादपत्राची साक्षांकित प्रत दाखल केली आहे. सदरचे वादपत्र हे प्रतिवादीच्या वडीलांनी वरिष्ठ दिवाणी न्यायालय, लातूर येथे कायमस्वरुपी मनाईच्या हुकूमासाठी दाखल केल्याचे दिसुन येते. सदर वाद पत्रामध्ये प्रतिवादीच्या वडीलांनी मौजे कुंभारी येथील गट नं.30 मध्ये त्याची एकुण 1 हेक्टर 43 आर शेतजमिन असल्याचे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे त्याने सदर वादपत्रात प्रस्तुत दाव्यातील वादीची त्याच्या गट नं.30 मधील शेतमिळकतीच्या लगत मिळकत असल्याचे नमुद केले आहे. सदर वाद पत्राचा संदर्भ देवुन वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, सन 2007 मधील या दाव्यामध्ये प्रतिवादीच्या वडीलांनी गट नं.30 मध्ये त्याची 1 हेक्टर 43 आर क्षेत्र असल्याचे नमुद केले आहे. त्याने कोठेही त्याचा गट क.29 मधील क्षेत्रावरती ताबा असल्याचे नमुद केलेले नाही. म्हणजेच सुरुवातीपासूनच वादीचा गट क.29 मधील संपुर्ण क्षेत्रावरती ताबा असल्याचे दिसुन येते.

10. अभिलेखावरिल दाखल रे.दि.मु.नं.381/2007 मधील वादपत्राची साक्षांकित प्रत पाहिली असता वादीच्या विधीज्ञांच्या युक्तिवादामध्ये तथ्य असल्याचे आढळुन येते. कारण सदर वादपत्रामध्ये प्रतिवादीच्या वडीलांनी कोठेही गट क.29 मध्ये त्याचा ताबा असल्याचे नमुद केलेले नाही. याउलट त्याने त्याचा गट क.30 मधील 1 हेक्टर 43 आर क्षेत्रावरती ताबा असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, सदर वादपत्र दाखल करण्यापुर्वी पासूनच वादीचा दावा मिळकतीवरती ताबा आहे.

11. अभिलेखावरिल दाखल रे.दि.मु.नं.381/2007 वादपत्रामध्ये परिच्छेद क.6 मध्ये प्रतिवादीच्या वडीलांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादीच्या वडीलांच्या

गट क्र.30 मधील मिळकतीच्या पश्चिमेला प्रस्तुत दाव्यातील वादीची 50 आर शेतमिळकत आहे आणि त्याच्या व प्रस्तुत दाव्यातील वादीच्या मिळकती दरम्यान सामाईक बांध आहे. सदर वादपत्रास प्रस्तुत दाव्यातील वादीने दिलेल्या कैफीयतीची साक्षांकित प्रत प्रतिवादीने दाखल केलेली आहे. त्यानुसार कैफीयतीच्या परिच्छेद क्र. 6 मध्ये वादपत्रातील मजकुरापैकी नातेसबंध मान्य करुन वादपत्रातील मजकुर म्हणजे 'The land gat no.29 admeasuring 50 R owned by defendant no.5 is towards western side of land of plaintiff and in between it there is a common bandh' हा जसाच्या तसा कैफियतीमध्ये लिहीलेला आहे. परंतू, तो मान्य आहे किंवा अमान्य आहे असे लिहीलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या मते वादीने रे.दि.मु.नं 381/2007 मधील वरिल मजकुर स्पेसिफीक डीनायल न केल्यामुळे तो मान्य केलेला आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीचा गट नं.29 मधील वाद मिळकतीमधील कब्जा मान्य केलेला आहे.

12. परंतू, अभिलेखावरिल दाखल रे.दि.मु.नं.381/2007 मधील प्रस्तुत वादीची कैफीयत पाहता परिच्छेद क्र.6 मधील मजकूराबाबत संदिग्धता आढळुन येते. त्याचप्रमाणे अभिलेखावरिल इतर कागदपत्रे आणि वादीच्या कथनांचे अवलोकन केल्यास वादीच्या वादपत्रातील व प्रस्तुत अर्जातील कथनाबाबत सुसंगतता आढळुन येते.

13. वादी व प्रतिवादी दोघेही दावा मिळकतीतील काही भागावरती त्यांचा कब्जा सांगत आहेत. प्रतिवादीच्या कैफयतीमधील कथनामधील विधानाप्रमाणे व त्याचप्रमाणे प्रतिवादीतर्फे विधीज्ञांच्या युक्तिवादाप्रमाणे दावा मिळकतीमधील काही भागावरती प्रतिवादीचा कब्जा आहे व सदर कब्जा वादी व प्रतिवादी मधील वाटणी प्रमाणे आहे परंतू, तुकडेबंदी कायदयाच्या अंमलबजावणीप्रमाणे झालेल्या चुकांच्यामुळे दावा मिळकतीच्या अभिलेख सदरी वादीचे नाव आहे. प्रतिवादीचा सदर बचावामध्ये तथ्य असु शकते. परंतू, सदर बचावाच्या अनुषंगाने प्रस्तुत अर्जावरती युक्तिवाद होईपर्यंत प्रतिवादींनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नव्हती. त्यानंतर दि. 11/11/2019 रोजी प्रतिवादींनी नि.क्र.40 सोबत काही कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यामध्ये वादमिळकतीचा सन 1971–72 चा टोच नकाशा, प्रतिवादीने

तुकडेबंदीच्या वेळी झालेली चुक दुरुस्त करण्यासाठी भुमिअधिक्षक लातूर यांच्याकडे दाखल केलेल्या अर्जाची प्रत आणि काही फोटो दाखल केल्या आहेत. तसेच प्रतिवादींनी मौजे कुंभारी ता. रेणापूर जि.लातूर येथील राहूल ज्ञानोबा कातळे, नागनाथ नामदेव कातळे, राजाभाउ कचरु भुतकर, सुग्रीव जगन्नाथ नागरगोजे आणि बाबासाहेब अण्णासाहेब कातळे यांची शपथपत्र दाखल केली आहेत. सदर शपथपत्रामध्ये त्यांनी प्रतिवादीचा ताबा वादीच्या गट क्र.29 मधील काही जमिन भागामध्ये असल्याचे नमुद केलेले आहे. त्याचप्रमाणे सदर शपथपत्रामध्ये वादी व प्रतिवादीच्या ताब्यातील भु–भागामध्ये एक नाला खोदलेला आहे असे नमुद केले आहे.

14. परंतू, अभिलेखावरिल दाखल इतर कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने असल्याचे दिसुन येते. प्रतिवादीने दाखल केलेल्या भुमिअधिक्षक लातूर यांच्याकडील तुकडेबंदीच्या वेळी झालेल्या चुकिला आव्हान देणारा अर्ज पाहिला तर असे लक्षात येते की, सदरचा अर्ज सन 2019 मध्ये केलेला आहे. म्हणजेच सन 1971 च्या तुकडे बंदीनंतर प्रतिवादीने सन 2019 मध्ये सदर एकत्रिकरण अधिका–यांनी केलेल्या मोजणीस आव्हान दिले आहे. त्यामुळे सदर अर्ज म्हणजे दावा दाखल झाल्यानंतर अथवा प्रस्तुतच्या अर्जावरती युक्तिवाद झाल्यानंतर सदरचा मोजणीस आव्हान दिल्याचा अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट होते. यावरुन सुध्दा प्रथमदर्शनी केस ही प्रतिवादींच्या बाजुने नसल्याचे स्पष्ट होते.

15. सन्मा. सर्वोच्च न्यायालयाने Anathula Sudhakar Vs. P.Buchi Reddy [AIR 2008 SC 2033] या केसमधील न्यायनिर्णयात असे निष्कर्ष नोंदवले आहे की, 'if two persons claim to be in possession of a vacant side, one who is able to establish title thereto will be considered to be in possession, as against the person who is not able to establish title.'

16. सन्मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वरिल निष्कर्षास अनुसरुन प्रस्तुत दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केल्यास दावा मिळकतीच्या अभिलेख सदरी

तुकडेबंदी कायदयाच्या अंमलबजावणीपासून वादीच्या नावाची नोंद असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. त्यामुळे प्रथमदर्शनी वाद मिळकतीवरती वादीचा कब्जा दिसुन येतो.

17. प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणात सन्मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे अशोक यशवंत धुमाळ विरुध्द शंकर मारोती धुमाळ [2001 (3) Bom C.R.27] आणि नारायण बिटे विरुध्द महादेव पिसे [2001 Vol. 103 (3) Bom L.R.540] मधील न्यायनिर्णय दाखल केले आहेत. त्यामध्ये सन्मा. उच्च न्यायालयाने असे निष्कर्ष नोंदवले आहेत की, Civil court has no jurisdiction to decide issues relating to consolidate scheme.

18. मी सन्मा. उच्च न्यायालयाच्या वरिल प्रमाणेच्या निष्कर्षाचा आदर ठेवुन नमुद करतो की, वरिल प्रमाणाचे निष्कर्ष प्रस्तुत दाव्यास लागु होत नाहीत. कारण प्रस्तुत दाव्यामध्ये एकत्रिकरण योजने प्रमाणे वाद मिळकती मध्ये झालेला बदल अव्हानीत करण्यात आलेला नाही. प्रस्तुतचा दावा हा केवळ मनाई हुकूमाचा आहे.

19. वरिल विवेचनाप्रमाणे प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने दिसुन येते. त्यामुळे न्यायाचा तराजु वादीच्या बाजुने झुकतो. प्रतिवादीच्या कैफयतीनुसार प्रतिवादी हे वादीचा दावा मिळकतीवरिल कब्जा नाकारत असल्यामुळे प्रस्तुत अर्जावरिल विनंती प्रमाणे तुर्तातुर्त मनाईचा हुकूम न दिल्यास वादीचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. याउलट वादी हे कागदोपत्री बराच वर्षापासून दावा मिळकतीमध्ये कब्जात आहेत असे प्रथमदर्शनी दिसत असल्यामुळे व प्रस्तुत अर्जाप्रमाणे तुर्तातुर्त मनाईचा हुकूम दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही. सबब मी मुद्दा क्र.1 ते 3 चे उत्तर होकारार्थी देवुन मुद्दा क्र.4 करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आ दे श</u>

1. नि.क्र.5 वरिल अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

2. प्रतिवादीला असे आदेशीत करण्यात येत आहे की, सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादमिळकती मधील वादीच्या ताबे वहिवाटीस त्याने स्वतः मार्फत अथवा इतर कोणत्याही व्यक्ती मार्फत हरकत अडथळा करु नये.

सही ∕ —

दिनांकः—12.12.2019

(एस. डी. यादव)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
रेणापूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D.F. file order are same word for word as per original order.

Name of Stenographer	: Dhanshri G. Bhadke
Court Name	: S. D. Yadav, Jt.C.J.J.D., Renapur.
Order Date	: 12/12/2019
Order signed by presiding officer on	: 12/12/2019
Order uploaded on	: 12/12/2019